7

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2019

SPECIAL ISSUE- 82 (A)

# पटकथा लेखन : स्वरुप आणि चिकित्सा



अतिथी संपादक :
**डॉ. इंद्रजित जाधव**
प्राचार्य,
बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता. आंबेगाव, जि. पुणे

विशेषांक संपादक :
**डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर**
मराठी विभाग प्रमुख
बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता. आंबेगाव, जि. पुणे

विशेषांक सहसंपादक :
**प्रा. पोपट माने, डॉ. पुरुषोत्तम काळे**

मुख्य संपादक :
**डॉ. धनराज धनगर**

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

291

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 82 (A) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67 ★

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक/लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | A legendary Films and Film-Makers | Dr. Amina Khatun | 05 |
| 2 | पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | श्रीनिवास भणगे | 08 |
| 3 | चित्रपट सृष्टीला दृगोच्चर करणारी पटकथा | डॉ. तुकाराम रोंगटे | 13 |
| 4 | तमिळ चित्रपट : एक दृष्टीक्षेप | डॉ. ताहेर पठाण | 17 |
| 5 | कन्नड मराठी पटकथा आणि वास्तव | डॉ. श्रीपती रायमाने | 21 |
| 6 | पटकथा लेखन :एक परिचय | डॉ.प्रमोद भगवान पडवळ | 24 |
| 7 | ठाकर जीवनावरील पटकथा लेखन | डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर | 31 |
| 8 | साहित्य आणि चित्रपट | डॉ. भास्कर ढोके | 34 |
| 9 | चित्रपट माध्यम आणि आदिवासी सामाज वास्तव | डॉ. वैजनाथ अनमूलवाड | 40 |
| 10 | पटकथा लेखन प्रक्रिया | सुरेश मेहेर | 45 |
| 11 | कथा ते पटकथा | डॉ. सुनील खामगळ | 49 |
| 12 | ऐतिहासिक कादंवरी आणि पटकथा लेखन | प्रा.चांगुणा कदम | 57 |
| 13 | माहितीपटाची संकल्पना आणि स्वरूप | डॉ. महेबूब सय्यद | 59 |
| 14 | माहितीपट निर्मितीचे तांत्रिक स्वरूप | डॉ. नवनाथ येठेकर | 65 |
| 15 | पटकथा लेखनप्रक्रिया | डॉ. राजेंद्र खंदारे | 69 |
| 16 | साहित्य आणि चित्रपट | डॉ. अनिल बांगर | 73 |
| 17 | पटकथा लेखन स्वरूप | डॉ. वंदना नढे | 78 |
| 18 | भारतीय प्रागतिक चित्रपट विशेष संदर्भ : 'काला' | मदन जाधव | 80 |
| 19 | पटकथालेखन : संकल्पना आणि स्वरूप | डॉ. प्रमोद घिवार | 83 |
| 20 | नाटक, पटकथा : शैली आणि तंत्र | प्रा. प्रमोद पवार | 87 |
| 21 | पटकथा लेखन आणि नाट्यलेखन | प्रा.विकास बहुले | 91 |
| 22 | पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | प्रा. शुभांगी बारवकर | 96 |
| 23 | लघुपट,माहितीपट आणि चित्रपट (सिनेमा) पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | प्रा. अपूर्वा बेतकेकर | 98 |
| 24 | पटकथेतील व्यक्तीरेखाटन आणि संवाद स्वरूप विशेष | प्रा.अरविंद जाधव | 102 |
| 25 | पटकथा लेखन आणि नाट्य लेखन यातील साम्य-भेद | डॉ. एम. एम. बागुल | 106 |
| 26 | पटकथा लेखनाचे तंत्र | डॉ. हनुमंत भवारी | 110 |
| 27 | पटकथा लेखन प्रक्रिया | सायली जगताप | 113 |
| 28 | चित्रपट, लघुपट, माहितीपट | डॉ.उज्ज्वला भोर | 118 |
| 29 | पटकथा लेखन- एक कला | डॉ. केतकी भोसले | 122 |
| 30 | चित्रपटाच्या निर्मितीप्रक्रियेमध्ये कॅमेऱ्याचे महत्त्व | डॉ.बाळासाहेब चव्हाण | 125 |
| 31 | पटकथा लेखनाचे तंत्र | प्रा.तुकाराम चव्हाण | 132 |
| 32 | पटकथा आणि इतर कला | प्रा.अमोगसिद्ध चेडके | 135 |
| 33 | मराठी चित्रपटसृष्टीची वाटचाल | डॉ. अनुल नारायण चौरे | 138 |
| 34 | पटकथा लेखन : संकल्पना व स्वरूप | डॉ.मधुकर बैकरे | 144 |
| 35 | साहित्यकृती व पारितोषिक प्राप्त चित्रपट | डॉ.सौ.मंगल डोंगरे | 147 |
| 36 | बाल नायकप्रधान श्यामची आई ते नाळ व्हाया टिंग्या : पटकथा लेखन | डॉ.दत्तात्रय डुंबरे | 151 |




292

Scanned by CamScanner

मराठी चित्रपटसृष्टीत विशुद्ध विनोदाची परंपरा निर्माण झाली. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ऐतिहासिक आणि पौराणिक मराठी चित्रपटांचा पाया भालजी पेंढारकरांनी घातला. राधा–कृष्णाच्या जीवनावर आधारित पौराणिक चित्रपट 'श्यामसुंदर' (१९३३) ह्या नावाने प्रदर्शित केला. तसेच त्यांनी दर्जेदार ऐतिहासिक चित्रपटांची निर्मिती केली. त्यामध्ये 'नेताजी पालकर' (१९४०), 'थोरातांची कमळा' (१९४१) व 'बहिर्जी नाईक' (१९४३) ह्या चित्रपटांमुळे भालजी पेंढारकर अजरामर झाले. समाजमनावर ह्या चित्रपटांनी अधिराज्य गाजवले. मात्र हा आनंद फारकाळ टिकला नाही. दुसऱ्या महायुद्धामुळे आणि आपापसातील कलहांमुळे प्रत्येकाने स्वतंत्रपणे चित्रपट संस्था निर्माण केल्या. त्यामुळे चित्रपटनिर्मितीचा खर्च वाढत गेला. थोड्या प्रेक्षकांच्या माध्यमातून तो वसूल होऊ शकला नाही. त्यामुळे वर्षाला फक्त ५ चित्रपट निर्माण झाले. एवढेच नव्हे तर मराठी चित्रपटांची स्पर्धा हिंदी चित्रपटांबरोबर असल्यामुळे चित्रपट दाखवण्यासाठी चित्रपटगृहे सुद्धा मिळत नव्हती. इ. स. १९४७ ते १९६० हा तेरा वर्षांचा कालखंड मराठी चित्रपट सृष्टीसाठी प्रतिकुल परिस्थितीचा ठरला तरीसुद्धा मराठी चित्रपटसृष्टीची परंपरा कायम राखण्याचे कार्य राजा परांजपे, अनंत माने, दत्ता धर्माधिकारी ह्या दिग्दर्शकांनी केले. ह्या संदर्भात सुधीर नांदगावकर म्हणतात, ''युद्धोत्तर मराठी सिनेमात राजा परांजपे हे अव्वल दिग्दर्शक ठरले, राजा परांजपेंचे 'पुढचे पाऊल'(१९५०), 'लाखाची गोष्ट'(१९५२),'पेडगावचे शहाणे'(१९५२), 'जगाच्या पाठीवर'(१९६०) हे चित्रपट यशस्वी ठरले. 'बालाजी मोरे'(१९५०), 'स्त्री जन्मा ही तुझी कहानी'(१९५२), 'पतिव्रता'(१९५९) या नायिकाप्रधान चित्रपटांद्वारे धर्माधिकारींनी स्वतःचे असे वेगळे स्थान निर्माण केले. धर्माधिकारींचे गाजलेले चित्रपट संकलित करणारे अनंत माने यांच्या 'प्रीती संगम'(१९५९), 'सांगत्ये ऐका'(१९५९), चित्रपटांना उदंड प्रेक्षक लाभला. मानेंनी मराठीत विनोदी कौटुंबिक व ग्रामीण तिन्ही प्रकारचे चित्रपट दिले.''[२] धर्माधिकारी यांनी स्त्री प्रश्नाला आपल्या चित्रपटात स्थान दिल्यामुळे साहजिकच स्त्रीवर्ग मराठी चित्रपटाकडे आकर्षित झाला. अनंत माने यांनी आपल्या चित्रपटात ग्रामीण आणि कौटुंबिक प्रश्नाला आपल्या चित्रपटात स्थान दिल्यामुळे खेड्यातील ग्रामीण माणूस मराठी चित्रपट पाहण्याकडे वळालेला दिसतो.

ग. दि. माडगूळकरांच्या रूपाने मराठी सिनेमाचे लेखन करणारा एक समर्थ लेखक मिळाला. त्यांनी 'ब्रम्हचारी', 'रामजोशी' आणि 'जय मल्हार' ह्या तीन चित्रपटांचे लेखन माडगूळकरांनी केले. ह्या चित्रपटांची गीतेसुद्धा माडगूळकरांनीच लिहिली. तिन्ही चित्रपट यशस्वी झाले. त्यामुळे मराठी साहित्याचे लेखन करणाऱ्या माडगूळकरांना मराठी चित्रपटसृष्टीत मानाचे स्थान प्राप्त झाले. पु. ल. देशपांडे यांनी १९५२ साली 'गुळाचा गणपती' हा विनोदी चित्रपट प्रदर्शित केला. आणि मराठी चित्रपटसृष्टी मधून बाहेर पडले. आचार्य अत्रे यांची स्वतःची असे पिक्चर्स संस्था होती. त्यांच्या 'श्यामची आई' (१९५३) ह्या चित्रपटास पहिला राष्ट्रपती सुवर्णपदकांचा सन्मान मिळूनही त्यांनी स्वतःची संस्था बंद केली. महाराष्ट्र राज्याची स्थापना होण्याच्या अगोदर, तमाशावर आधारीत चित्रपटांची लाटच आली होती. ह्यामध्ये कौटुंबिक आणि ग्रामीण प्रश्न मांडल्यामुळे ग्रामीण आणि मध्यमवर्गातील प्रेक्षकवर्ग लाभला. ह्या काळात 'सांगत्ये ऐका' नावाचा चित्रपट प्रचंड गाजला. या चित्रपटाच्या प्रभावाखाली इतर चित्रपटांची निर्मिती झालेली दिसते. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. १९६२ साली मराठी चित्रपटांना केंद्र सरकारच्या धर्तीवर आधारीत पारितोषिक द्यायला सुरूवात झाली होती. पहिल्या वर्षी मधुकर पाठक यांच्या 'प्रपंच' राजा परांजपे यांच्या 'सुवासिनी' आणि अनंत माने यांच्या 'शाहीर परशुराम' ह्या चित्रपटांना पारितोषिके मिळाली. ह्या चित्रपटांची कथा–पटकथा संवाद, गीते ही ग. दि. माडगूळकरांनी लिहिलेली होती. तिन्ही चित्रपट हे सामाजिक विषयावर



293

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

Scanned by CamScanner

पटवर्धन यांचा '२२ जून १८९७' जब्बार पटेल यांची 'सिंहासन' (१९७९), डॉ. लागू यांचा 'झाकोळ' (१९८०) इतर चित्रपटांचा उल्लेख करता येतो.

इ.स. १९८० चे दशक हे विनोदी चित्रपटाचे दशक म्हणून ओळखले जाते. ह्या कालखंडात व्ही. के. नाईक यांचा 'गोधळात गोंधळ'(१९८१) डॉ जब्बार पटेल यांचा 'उंबरठा', अमोल पालेकरांचा 'आक्रित' हे चित्रपट प्रदर्शिक झाले, 'उंबरठा' आणि 'आक्रित' ह्या चित्रपटांचे कथालेखन विजय तेंडूलकरांनी केले होते. हे दोन्ही चित्रपट आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊन पोहचले. स्त्री प्रश्नावर आधारीत 'उंबरठा' सिनेमा याच कालखंडात प्रदर्शित झाला. हा चित्रपट शांता मिसळ यांच्या 'बेघर' आत्मकथनावर आधारीत होता. याच कालखंडात रंगमंचाकडून चित्रपट सृष्टीकडे वळालेले विजय मेहता आणि अरविंद देशपांडे यांचा प्रभाव मराठी चित्रपटसृष्टीत जाणवला नाही. त्यांनी 'स्मृतिचित्रे'(१९८४) व 'शापित'(१९८२) हे चित्रपट प्रदर्शित केले. तसेच दामू केंकरे यांनी 'तुझ्यावाचून करमेना' (१९८६) हा विनोदी चित्रपट प्रदर्शिक केला. यानंतर मराठी चित्रपटसृष्टीत विनोदाची लाट आलेली दिसते. सचिन पिळगावकरांचा 'नवरी मिळे नवऱ्याला' (१९८४), महेश कोठारे यांचा 'धूमधडाका' (१९८५) हे विनोदी चित्रपट प्रदर्शित झाले. वसंत सबनिसांनी 'नवरी मिळे नवऱ्याला' या चित्रपटाचे कथानक लिहिले. तर अण्णासाहेब देऊळगावकरांनी 'धुमधडाकाचे' कथानक लिहिले. ह्या संदर्भात सुधीर नांदगावकर म्हणतात की, ''सचिन आणि महेश यांनी हिंदी चित्रपटांचे अनुकरण मराठीत केले. सचिनचे नंतर 'गंमत जंमत' (१९८५) 'अशी ही बनवाबनवी' (१९८६) हे विनोदी चित्रपट तुफान यशस्वी झाले. महेशचे 'दे दणादण' (१९८५) 'थरथराट' (१९८६) ही विनोदी चित्रपट लोकप्रिय झाले.''[३] ८० च्या दशकातील मध्यमवर्गीय आणि ग्रामीण प्रेक्षक विनोदी सिनेमाकडे वळालेला दिसतो. त्यामुळे राजदत्त यांचा 'पुढचं पाऊल' (१९८६) हा सामाजिक चित्रपट दुर्लक्षित झाला. तसेच सतीश रणदिवेंचा 'बहुरूपी' (१९८४) हा गंभीर चित्रपटसुद्धा प्रेक्षकांनी दृष्टीआड केला. यानंतर मात्र कांचन नायक यांनी 'कळत नकळत' (१९८९) हा कौटुंबिक कथानकावर आधारीत चित्रपट प्रदर्शित केला. ह्या चित्रपटाला प्रेक्षकांनी बऱ्यापैकी प्रतिसाद दिला. यानंतर पुरुषोत्तम बेर्डे यांनी 'हमाल दे धमाल' (१९८९) ह्या विनोदी चित्रपटाची निर्मिती केली. प्रेक्षकांनी याला भरभरून चांगलाच प्रतिसाद दिला.

इ.स. १९९० नंतर विजय कोंडके यांनी 'माहेरची साडी' नावाचा चित्रपट प्रदर्शिक केला. ह्या चित्रपटाला ग्रामीण स्त्रियांनी, कामगार स्त्रियांनी भरभरून प्रतिसाद दिला. कौटुंबिक कथानकावर आधारीत स्त्री प्रधान चित्रपटाने मराठी स्त्री मनावर अधिराज्यच गाजवले. महाराष्ट्रातील तळागाळातील शेतकरी कुटुंबातील, शहरातली मोलकरणी, गिरणी कामगार, झाडू कामगार अशा तळागाळातील प्रेक्षकांनी 'माहेरची साडी' ह्या चित्रपटास गर्दी केली. मराठी प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद ह्या चित्रपटास मिळाला. या चित्रपटाच्या धर्तीवर दादा कोंडके यांनी 'सासरचे धोतर' (१९९६) हा विनोदी चित्रपट प्रदर्शित केला. मराठी सिनेमा पुन्हा जुन्या फॉर्म्युल्यात अडकणार अशी भिती निर्माण झाली होती. मात्र १९९० नंतरच्या जागतिकीकरणामुळे मराठी सिनेमाचा प्रेक्षकवर्ग घटला होता. घराघरात विविध टीव्ही, चॅनेल्स पोहचल्यामुळे घर बसल्या बसल्या असंख्य चित्रपट प्रेक्षकांना पाहायला मिळत होते. त्यामुळे पुन्हा एकदा मराठी चित्रपटांना उतरती कळा लागली होती. जब्बार पटेल यांनी 'एक होता विदूषक' (१९९२), पुरुषोत्तम बेर्डेंचा 'भस्म' (१९९४) व स्मिता तळवळकर यांचा 'सवत माझी लाडकी' (१९९२) हे चित्रपट प्रदर्शिक झाले. परंतू ह्या सिनेमांना प्रेक्षकांचा म्हणावा तसा प्रतिसाद लाभला नाही.



294
Scanned by CamScanner

यशवंत दत्त, स्मिता पाटील, अजिंक्य देव, अलका कुबल, रीमा, लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन, निवेदिता जोशी, सुप्रिया पिळगावकर, अतुल कुलकर्णी, सोनाली कुलकर्णी, अरुण नलावडे, संदीप कुलकर्णी, संजय नार्वेकर, भरत जाधव, मकरंद अनासपुरे, सिद्धार्थ जाधव अशा कितीतरी कलाकरांनी मराठी चित्रपटात आपल स्वतःच स्थान निर्माण केले.''[६] प्रत्येक कालखंडात ह्या कलावंतांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे आपल्या वेगळ्या व्यक्तिमत्त्वाने ते चित्रपटसृष्टीत अजरामर झाले. मराठी चित्रपटांना संगीतकारांची एकनवी पिढी मिळाल्याने मराठी चित्रपटसृष्टी अधिकाधिक बहरलेली दिसते. ह्यामध्ये भास्कर चंदावरकर, आनंद मोडक, अशोक पत्की, श्रीधर फडके, अजय–अतुल, सलील कुलकर्णी, इतर संगीतकारांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर मराठी चित्रपट झळकले आहेत. मराठी साहित्यिकांनी समाजातील महत्त्वपूर्ण प्रश्नांना हात घालून प्रत्येक कालखंडात मराठी चित्रपटांना नव–नवे कथानक दिले. त्यामुळे प्रत्येक कालखंडातील मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीला उतरलेले दिसतात. मराठी चित्रपटांमधून ग्रामजीवन, शहरीजीवन, चाळसंस्कृती, स्त्रीप्रश्न, हुंडाप्रश्न, ग्रामीण राजकारण, शैक्षणिक अडचणी, सहकारातील भ्रष्टाचार, लावणी–पोवाडा, तृतीयपंथीयांचे प्रश्न, जागतिकीकरणाचा परिणाम, मनोरंजनात्मक रहस्यमय अशा अनेक विषयांना घेऊन मराठी चित्रपटाने आजपर्यंतची वाटचाल केली आहे. समाज–साहित्य आणि मराठी चित्रपट यांची साखळीवजा गुंफण असून ती एकमेकापासून वेगळी करता येणार नाही. त्यांचा एकमेकांशी अतुट असा संबंध असल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**

१. कर्णिक मधु मंगेश, (संपा.), 'सांस्कृतिक महाराष्ट्र १९६० ते २०१० भाग–१', प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती २०११, पृ.क्र. ५८
२. तत्रैव, पृ.क्र. ४०
३. तत्रैव, पृ.क्र. ४८
४. तत्रैव, पृ.क्र. ७०, ७१
५. तत्रैव, पृ.क्र. ७१
६. तत्रैव, पृ.क्र. ७१



295

Scanned by CamScanner